# जाहिरात

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय मुंबई या विभागात कंत्राटी पध्दतीने भरती करण्यासाठी महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाच्या निर्णय क्रमांक: संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३ दिनांक १७ डिसेंबर २०१६ मधील तरतुदी नुसार राज्य शासनाच्या सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या उप/सह सचिव,मंत्रालय यांचेकडुन खालील विवक्षित कामे पार पाडण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

I. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय तसेच संलग्नित रुग्णालय बांधकाम यंत्रसामुग्री उपलब्ध करण्यासंदर्भात कार्यवाही करणे.

II. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय संलग्नित रुग्णालयांचे व्यवस्थापनासंदर्भातील कामकाज.

III. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय , संलग्नित रुग्णालय इमारतींचे बांधकाम व यंत्रसामुग्रीसाठी निविदांसंदर्भात कार्यवाही करणे.

IV. केंद्र पुरस्कृत योजना संदर्भातील कामकाज

V. राज्य शासनाच्या एकत्रित निधी शिवाय इतर स्त्रोतांमधून उपलब्ध होणा-या निधीमधून करावयाची कामे

VI. वरिल बाबीसंदर्भातील अर्थसंकल्पीय कामकाज

अ) पदासाठी अर्हता व अनुभव

१. उप सचिव/सह सचिव या पदावरील कामाचा एकत्रित अनुभव कमीत कमी ५ वर्षे इतका असावा.

२. उमेदवाराविरुध्द कोणतीही विभागीय चौकशी सुरु किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी विरुध्द त्यांना शिक्षा झालेली नसावी.

ब) वयोमर्यादेची अर्हता

१. अर्जदाराचे वय ६५ वर्षापेक्षा जास्त नसावे.

क) करार पध्दतीने करावयाच्या नियुक्तीबाबत अटी व शर्ती:-

१. करार पद्धतीने नियुक्ती एका वेळी जास्तीत जास्त एक वर्षासाठी देण्यात येईल. मात्र एकूण कालावधी तीन वर्षे पेक्षा जास्त असणार नाही.

**ड) नियुक्ती कालावधीत मासिक परिश्रमिक व भत्ते प्रकरणी दि.१७.१२.२०१६ व दि.०८.०९.२०२३ रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही केली जाईल.**

१. संदर्भीय शासन निर्णयान्वये, सेवानिवृत शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना नियुक्तीच्या वेळी महागाई भत्यासह मिळत असलेल्या निवृत्ती वेतना एवढी रक्कम (अंशराशीकृत निवृत्ती वेतन वगळून) त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात येईल.

२. पारिश्रमिक रकमेची गणना करणेकामी सेवानिवृत्तीपूर्वी मिळत असलेले एकूण वेतन व एकूण आता मिळत असलेले एकूण निवृत्तीवेतन या संबंधातील कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

३. करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाबाबत / सामावून घेण्याबाबतचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार / हक्क नसेल.

४. नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित व्यक्तीची राहील व तसे बंधपत्र / हमीपत्र रु. १००/- चे नोंदणीकृत स्टँपपेपरवर नियुक्तीच्या वेळी देणे आवश्यक आहे. तसेच सदर

बंधपत्रात / हमीपत्रात करार पध्दतीने नियुक्ती देताना शासनाने व विभागाने निश्चित केलेल्या अटी व शर्ती, करार पध्दतीवरील उमेदवाराकडून नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करण्यात येणार नाही, यांचा समावेश करून सदर अटी व शती मान्य असल्याचा उल्लेख करारात करण्यात यावा.

५. नियुक्ती प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिकारी/ कर्मचारी यांच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्यात अधिकार राहतील.

६.अशा अधिकारी / कर्मचारी यांना Conflict of Interest जाहीर करणे आवश्यक राहील.

७. अशा अधिकारी कर्मचारी यांना आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना त्यांच्या निवृत्ती वेळच्या वेतनमानास अनुसरुन प्रवासभत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील.

८. अशा करार पध्दतीवरील अधिकारी कर्मचारी यांनी त्यांना प्राप्त होणा-या कागदपत्रे/ माहिती व आधार सामुग्रीबाबत गोपनियता पाळणे आवश्यक राहील.

०९. नियुक्त अधिकारी / कर्मचारी यांनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्ती प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मुल्यमापन करतील.

१०. सेवानिवृत्त होऊन देखील शासकीय निवासस्थानात राहणा-या व्यक्तीची करार पध्दतीने नेमणूक केल्याचे आढळल्यास व करार कालावधीत तो अधिकारी शासकीय निवासस्थानात राहत असल्यास त्याच्याकडून प्रचलित शासन नियमानुसार तथा त्या त्यावेळेस प्रचलित नियमानुसार अधिकचे दंडनिय दराने अनुज्ञाप्ती शुल्क वसूल करण्यात येईल.

११. अर्ज करण्याच्या सेवानिवृत अधिकारी यांनी शेवटच्या पाच वर्षाच्या गोपनीय अहवालाची प्रतवारी संबंधित कार्यालयाकडून प्रमाणित करून तसे प्रमाणपत्र सादर करावे. तसेच प्रशस्तीपत्रक नेपुण्यपुर्वक काम केले असल्यास तसे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे.

१२. क्षेत्रिय स्तरावरून करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास सेवा कालावधीमध्ये काही नैसर्गिक काही आजार उद्भवल्यास कार्यालय / शासन बांधील राहणार नाही. त्याबाबत प्रतिपुर्ती दावा करता येणार नाही.

१३. करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास नियुक्तीच्या ठिकाणी आदेश निर्गमित झालेल्या दिनांकापासून १५ दिवसाचे आत रुजू होणे बंधनकारक राहील. अन्यथा सदर नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.

१४. वरीलपैकी एकाही अटीची पूर्तता होत नसलेस अर्जदार याचा अर्ज अपात्र ठरेल. तसे ज्याचा अर्ज अपात्र ठरतील त्यांना याबाबत काहीही कळविले जाणार नाही. तसेच कोणतेही पत्रव्यवहार केला जाणार नाही याची सर्व अर्जदारानी नोंद घ्यावी.

१५. करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करता येणार नाहीत.

ड) आवश्यक सूचना

१. सदर पदाकरिता करावयाचे अर्जाचा नमुना जाहिराती सोवत जोडण्यात आलेला आहे. सदर विहित नमुन्यातील अर्ज स्वतःच्या हस्ताक्षरात किंवा टंकलिखित करुन फोटोसह सादर करण्याचा आहे. विहित नमुन्यात नसलेले व अपूर्ण अर्ज अपात्र समजणेत येतील.

२. अर्जामध्ये उमेदवाराने संपूर्ण नाव, पत्रव्यवहाराचा पत्ता, जन्मतारीख, वय, शैक्षणिक अर्हताबाबतचा संपूर्ण तपशील, कामाचा अनुभव असल्यास त्याबाबत तपशील इत्यादी माहिती नमूद करणे आवश्यक आहे. अपूर्ण माहिती भरलेले अर्ज अपात्र ठरविणेत येतील.

३. अर्जासोबत २२ से.मी. १२ से.मी. आकाराचा, स्वत:चे नाव व पत्यासह पोष्टाचे रुपये १०+२ चे तिकीट लावलेला लिफाफा जोडावा.

४. उमेदवारांनी आपले अर्ज समक्ष किंवा पोस्टाद्वारे उप सचिव(आस्थापना),वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,९ वा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल, मंत्रालय, मुंबई ४००००१ या पत्यावर जाहिरात प्रसिद्ध झालेल्या तारखेपासून ७ दिवसांपर्यंत कार्यालयीन वेळेपर्यंत पोहोचतील अशा बेताने पाठवावीत त्या नंतर पोष्टाद्वारे वा अन्य प्रकारे प्राप्त होणा-या अर्जाची अथवा त्यासंबंधी कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही.

५. वयाबाबत जन्मतारखेचा दाखला/ शाळा सोडलेचा दाखला/ सेवापुस्तकांचे पहिल्या पानाची प्रत यावरून ग्राहय धरता येईल. सत्यप्रत जोडणे आवश्यक आहे. अर्जासोबत दाखला जोडलेला नसल्यास अर्ज आपोआप अपात्र ठरेल.

६. वरीलपैकी एकाही अटीची पूर्तता होत नसल्या स अर्जदार यांचा अर्ज अपात्र ठरेल. तसेच ज्यांचे अर्ज अपात्र ठरतील त्यांना याबाबत काहीही कळविले जाणार नाही. तसेच कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही याची सर्व अर्जदारांनी नोंद घ्यावी.

७. सदरचे भरती प्रक्रियेत पदांचे फेरबदल तसेच भरती प्रक्रिया कोणत्या कारणास्तव स्थगित अथवा रद्द करण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकारी राखून ठेवीत आहेत.

-----------------------------------

**अर्जाचा नमुना**

वैदयकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई येथे सेवानिवृत्त झालेल्या सह सचिव या अधिकाऱ्यांची करार पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत.

अर्जदाराने अलिकडच्या काळातील
स्वत:चे छायाचित्र येथे चिटकवावे

**१. अर्जदाराचे संपूर्ण नाव:-**

**२. अर्जदाराचा पत्ता:-**

**३. सेवानिवृत्तीच्या वेळेचे पदनाम व कार्यालय:-**

**४. जन्म दिनांक व वय:-**

**५. सेवानिवृत्तीचा दिनांक:-**

**६. शैक्षणिक अर्हता:-**

**७. अनुभव:-**

**८. भ्रमणध्वनी क्रमांक:-**

उपरोक्त पदावर करार पध्दतीने नियुक्तीबाबत जाहिरात/ सूचना मी काळजीपूर्वक वाचली असून, सदर सुचनेतील अटी व शर्ती मला मान्य आहेत.

ठिकाण:-

दिनांक:-

अर्जदाराची स्वाक्षरी